SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 PGBUTR-0231-2609139/2609296
Fax : 0091-231-2693294 website : www.unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० पी.जी.बी.यु.टी.आर.– ०२३१.२६०९१३९/२६०९२९६
फॅक्स : ००९१–२३१– २६९३२९४ E-Mail : pgbutr@unishivaji.ac.in

Estd: 1962
NAAC 'A' Grade,
MHRD-NIRF-28th Rank

संदर्भ क्र.पीजी/बीयुटीआर/पीएच.डी./ 5939 दि. 30 SEP 2010

# परिपत्रक

## 'अनुभव' न्यू यॉर्कची गंगाधर गाडगीळ मराठी संशोधन शिष्यवृत्तीबाबत...

'अनुभव' न्यू यॉर्क तर्फे महाराष्ट्रातील मराठी भाषेत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना, मराठी नवकथेचे जनक गंगाधर गाडगीळ यांच्या नावे असलेली एक द्वैवार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येईल. शिष्यवृत्ती प्रत्येकी दोन लाख रूपयांची असेल, एका वेळेस पुढे नमुद केलेल्या विषयांपैकी कुठल्याही विषयात पीएच.डी. करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना देण्यात येईल. काव्य, कथा, भाषाशास्त्र, कादंबरी आणि विज्ञान कथात्कम साहित्य. सदर शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज इच्छुकांनी **www.anubhavtrust.org** या वेब-साईट वरूनच डाऊनलोड करावे लागतील. उपरोक्त शिष्यवृत्ती बाबतची इतर अनुषंगीक माहिती सोबत जोडलेली असून सदरची माहिती विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

कळावे.

आपला विश्वासू

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ

प्रत :

1. मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. सर्व प्राचार्य/संचालक, सलग्नीत सर्व कला महाविद्यालये/संस्था, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
3. इंटरनेट सेल (सर्व मराठी भाषेतील संशोधनार्थींच्या माहितीकरीता सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळार ठेवणेकरीता).

## 'अनुभव' न्यू यॉर्कची गंगाधर गाडगीळ मराठी संशोधन शिष्यवृत्ती



'अनुभव' न्यू यॉर्क तर्फे, महाराष्ट्रातील मराठी भाषेत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना, मराठी नवकथेचे जनक गंगाधर गाडगीळ यांच्या नांवे असलेली एक द्वैवार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येईल.

**शिष्यवृत्ती प्रत्येकी दोन लाख रुपयांची असेल. एका वेळेस पुढे नमूद केलेल्या विषयांपैकी कुठल्याही विषयात Ph. D. करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येईल: काव्य, कथा, भाषाशास्त्र, कादंबरी, आणि विज्ञान कथात्म साहित्य.**

दर दोन वर्षातून दिल्या जाणाऱ्या या शिष्यवृत्तीसाठीचे विषय वरील पाच विषयातून आलटून पालटून ठरवले जातील. ही शिष्यवृत्ती, पूर्णतः खासगी असून, तिचा भारतातील कुठल्याही विद्यापीठाशी अथवा सरकारी यंत्रणेशी संबंध नाही. उमेदवारांच्या निवडीसाठी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विद्यापीठाच्या चार अभ्यासू प्राध्यापकांची एक निवड समिती प्रस्थापित करण्यात आली आहे. ही निवडसमिती दर दोन वर्षांनी तीन उमेदवारांची निवड करील.

या शिष्यवृत्तीच्या व्यवस्थापनेसाठी 'अनुभव' ने महाराष्ट्रात एक संपर्क केंद्र प्रस्थापित केले असून त्याचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

**'अनुभव' द्वारा डॉ. संजीवनी तडेगावकर, 'ज्ञानेश्वरी', शिव नगर, जुना जालना,**
**जालना – ४३१-११४ दूरभाष:** ९४२३४५७६२३, ९४२१४९४७४६, ७०६६१०३३०५
**ई-मेल**: tadegawkarsanjiwani@yahoo.com

मात्र शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज इच्छुकांना **www.anubhavtrust.org** या वेब-साईट वरूनच डाऊनलोड करावे लागतील. भरलेले अर्ज उमेदवारांनी वरील पत्त्यावर डॉ. संजीवनी तडेगावकर यांना, किंवा स्कॅन करून **reach@anubhavtrust.org** या इ-मेल वर पाठवावेत. अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या फोटोकॉपीज, तसेच आधार कार्ड ची फोटोकॉपी जोडणे आवश्यक आहे. या कागदपत्रांशिवाय अर्ज वैध मानला जाणार नाही. **भरलेले अर्ज वरील पत्त्यावर पोचण्याची अंतिम तारीख १५ ऑक्टोबर २०१६ आहे.** अंतिम तारखेनंतर पोचलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

## 'अनुभव'च्या गंगाधर गाडगीळ मराठी संशोधन शिष्यवृत्ती अर्जासाठी योग्यतेच्या अटी

1. या शिष्यवृत्तीसाठी धर्म, जात, लिंग इत्यादीचे बंधन नाही.
2. ही शिष्यवृत्ती यु. जी. सी. अंतर्गत महाराष्ट्रातील कुठल्याही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. **काव्य, कथा, भाषाशास्त्र, कादंबरी, आणि विज्ञान कथात्म साहित्य** या विषयांशी संबंधित Ph. D. करणाऱ्या उमेदवारालाच ही शिष्यवृत्ती देण्यात येईल.
3. अर्ज करते वेळी उमेदवाराचे वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.
4. उमेदवार कुठल्याही कायम नोकरीत नसावा.
5. अर्ज करतेवेळी उमेदवाराला इतर कुठलीही शिष्यवृत्ती (सरकारी अथवा खाजगी) प्रदान झालेली नसावी. तसेच या शिष्यवृत्तीसाठी निवड झाल्यास, उमेदवार त्यानंतर ३ वर्षांच्या काळात इतर कुठलीही शिष्यवृत्ती स्वीकारू शकणार नाही.
6. अर्ज करतेवेळी उमेदवाराचे Ph. D. रजिस्ट्रेशन झाले असेल तरच उमेदवार या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल.
7. शिष्यवृत्ती मिळाल्यापासून तीन वर्षाच्या आत विद्यार्थ्याने विद्यापीठास प्रबंध सदर करणे बंधनकारक राहील.
8. उमेदवाराला कॉम्प्युटर चे किमान ज्ञान (ई-मेल पाठवणे इ.) असणे आवश्यक आहे.
9. उमेदवाराला प्रत्यक्ष मुलाखालीसाठी एकदा निवडसमिती समोर स्वतःच्या खर्चाने हजर व्हावे लागेल. त्यावेळी प्रत्येक उमेदवाराला एक Psychometric Test (व्यक्तीमत्वविषयक लेखी चांचणी) द्यावी लागेल. या चाचणीचा कालावधी ३० मिनिटे असेल.
10. अंतिम निवडीच्या संदर्भात निवडसमितीचा निर्णय अंतिम असेल.